परमशांति

# बेहदचे परम ज्ञान

## (आत्मज्ञानाकडे वाटचाल)



www.paramshanti.org

# बेहदचे

# परम

# ज्ञान

एक पाऊल आत्मज्ञानाच्या दिशेने

## **बेहदच्या ज्ञानाचा परिचय** (प्रस्तावना)

गीतेत सांगितले आहे की जेंव्हा जेंव्हा धर्मग्लानी होईल तेंव्हा तेंव्हा परमात्मा या स्रुष्टीवर साधारण रूपात येऊन अधर्माचा अंत करतील. मग आज काय अधर्म आणि अत्याचार होत नाही आहेत का?आणि मनुष्य पशुसमान वागताना दिसत नाही आहे का?आजकाल हे जग इतकं दर्जाहीन कसं काय होत चाललंय? याउपर आणखीन काय कलियुग यायचं बाकी आहे?जे आपण या स्थूल डोळ्यांनी बघतो,केवळ तेवढेच सत्य आहे का?आपण या पाच तत्वांच्या म्रुत्युलोकात कसे आणि केव्हा आलो याचे रहस्य कोण सांगू शकेल? याचे रहस्य कुणीही धर्मपिता, धर्मगुरु किंवा महात्मा सांगू शकत नाही. म्हणूनच श्रीमत् भगवत् गीतेत श्रीकृष्णांनी सांगितले आहे की-(मीच संत, महात्मा आणि गुरूंचा उध्दार करतो). केवळ परमात्माच आपल्याला म्रुत्युलोकातून अमरलोकात पोचण्यासाठीचे दिव्य ज्ञान देऊ शकतो. तसेच आपण या पाच तत्वांतून निघून परम तत्वांच्या दुनियेत कसे काय जाऊ शकतो, हे केवळ आपल्याला परमात्म्याचे ज्ञान घेतल्यानंतरच समजते. ज्याप्रकारे मातेच्या गर्भात आधी बीजारोपण होतं आणि मग त्याला हळूहळू आकार येत येत तो पाच तत्वांचा पुतळा तयार होतो.त्याचप्रमाणे आपण निराकारीतून आकारी आणि आकारीतून साकारी स्वरूपात हळूहळू अवतरीत झालोय. जेंव्हा न धरती, न वायू, न आकाश होते, तेव्हा काय होते? तसेच चंद्र, तारे आणि नक्षत्रे कुठून आली?आपण आधी कुठे होतो आणि आपण प्रुथ्वीवर कसे काय आलो?जी  द्रुष्ये आपण या स्थूल डोळ्यांनी पाहतो ती जर खोटी असतील तर मग सत्य काय आहे?आज आपले देवी देवता कुठे आहेत?ते पण आज मनुष्य रूपात धरतीवर वावरत आहेत का?आज या  प्रुथ्वीवर जेवढे धर्म आहेत ते या काही हजार वर्षांपूर्वीच आले आहेत, पण आपले ब्रम्हांड तर काही खरब वर्षे जुने आहे ना.मग हे पहिले पहिले धर्म पिता आहेत त्यांचे पूर्वज कोण आहेत?आणि हे सर्व धर्म यायच्या आधी कुठला धर्म होता?परमात्मा धर्माशी बांधील आहे का?परमात्म्याला आपण घरबसल्या प्राप्त करू शकतो का?आपली प्रुथ्वी या ब्रम्हांडात एका सुयीच्या टोकाएवढी आहे फक्त, आणि आपल्या शास्त्रात लिहिले आहे की क्षणाक्षणाला ब्रम्हांडे निर्माण होतात आणि संपतात, तर अनंत कोटी ब्रम्हांडे काय आहेत, ती कशी तयार झाली आणि कुणी बनवली, आणि या अनंत कोटी ब्रम्हांडाचा मालक कोण आहे? या ब्रम्हांडाचा चालक कोण आहे, तो ते ब्रम्हांडाचे व्यवहार कसे चालवतो आणि ब्रम्हांडाचे विसर्जन कसे करतो. अविनाशी दुनिया कुठे आहे आणि आत्मा तिथे कसा काय जाऊ शकतो. बेहदचे अमर्याद विश्व किती मोठे आहे?त्याच्या आदि,मध्य आणि अंताचे रहस्य काय आहे?या सर्व प्रश्नांचे उत्तर जाणून घेण्यासाठी आपल्याला या पुस्तकातील अमर्याद ज्ञान सागरात खूप खोलवर जावे लागेल आणि नंतर जी माहिती मिळेल त्याने तुमचे समाधान होईल. आणि नंतर तुम्ही परम शांतीच्या मार्गावर अग्रेसर व्हाल कारण आत्मस्वरूप होऊन परम शांती मध्ये लीन होणं हेच तर आपलं अंतिम ध्येय आहे. परम शान्ती.

विषय


| | |
|---|---|
| १. मर्यादित (हद) आणि अमर्याद (बेहद)आत्मा | 1 |
| २. शिव, महाशिव आणि परम महाशिव यामधील अंतर | 3 |
| ३. कालचक्र आणि ब्रम्हाचा समय | 6 |
| ४. अमर्याद (बेहद) विश्व किती व्यापक आहे | 8 |
| ५. अमर्याद (बेहद) विश्वाचे मालक किंवा वडील कोण | 10 |
| ६. अमर्याद (बेहदचा) योग कुणाशी लावावा | 12 |
| ७. अमर्याद (बेहदच्या) विश्वाचे महापरिवर्तनासाठी महामंत्र | 14 |
| ८. विनाश नाही, आता अमर्याद (बेहद) विश्वाचे महापरिवर्तन होईल | 16 |
| ९. स्व परिवर्तनातून विश्व परिवर्तन कसे होईल | 19 |
| १०. आपण सहयोगी कसे बनाल | 21 |
| ११. आत्मस्वरूपात परम प्रकाशाची अनुभूती | 23 |
| १२. YouTube चॅनल बाबत महत्त्वाची माहिती | 24 |
| १३. बेहदच्या माँ (आई) चे दिव्य संदेश | 28 |
| १४. परम महासंकल्प (affirmations) | 29 |

## १. मर्यादित(हद) आणि अमर्याद(बेहद)आत्मे

-----------------------------------------------

हद (मर्यादित) म्हणजे पाच तत्वांचे आणि बेहद (अमर्याद) म्हणजे या मर्यादित विश्वाच्या पलीकडे असणारे परम तत्वांचे जग. आत्म्याच्या रहस्याबद्दल तर आपण सर्व जण जाणतो आणि मान्य करतो, पण त्याच्या मूळ स्वरूपाशी आपली ओळख आहे का? मर्यादित आत्म्याचे सृजन तत्वांपासून झाले आहे तर अमर्याद आत्मा परम प्रकाशापासून सृजित आहे. मर्यादित आत्मा आणि जीवात्मा यात काहीच फरक नाही, कारण दोन्हीही अमर्याद ज्ञानापासून लांब राहतात आणि त्यांचे परम सत्य ज्ञानाशी काहीच देणे घेणे नसते. हे मर्यादित आत्मे या मायावी दुनियेतच मग्न असतात आणि याउलट अमर्याद आत्मे परम दिव्य ज्ञानाच्या शोधार्थ सगळीकडे भटकत राहतात, आणि विश्व कल्याण कसे करता येईल ते बघत असतात.

मर्यादित आत्म्याचे स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर आणि कारण शरीर असते तर अमर्याद आत्म्याचे स्थूल, सूक्ष्म, कारण,महाकारण आणि परम महाकारण शरीर असते. अमर्याद आत्म्यामध्ये अमर्याद शक्ती असतात ज्या अनेकानेक आवरणांच्या खाली दबलेल्या असतात. म्हणूनच या शक्ती जागवण्यासाठी आत्म्याच्या शक्ती जागवायला हव्यात.अमर्याद आत्म्यांमध्ये अमर्याद परम प्रकाश आहे जो अनंतानंत सूर्यांच्या शक्ती पेक्षाही जास्त शक्तीशाली आहे. या शक्तींना जाग्रुत करण्यासाठी आत्म्याला चार पुरूषार्थांच्याद्वारे (ज्ञान, योग, सेवा, धारणा) ही आवरणे (पुटे) दूर करावी लागतील.

*हदच्या (मर्यादित) आत्म्यावरील आवरणे:- १) आकाश २) वायु ३) अग्नि ४) जल ५) प्रुथ्वी

*बेहद (अमर्याद) आत्म्यावरील आवरणे:- १) परम प्रकाश २) परम महातत्व ३) परम तत्व(परम आकाश, परम वायू, परम अग्नि) ४) स्थूल आकाश तत्त्व ५) स्थूल वायू ६) स्थूल अग्नि ७) स्थूल जल ८) स्थूल प्रुथ्वी तत्व

आता प्रश्न हा आहे की आत्म्यामध्ये शक्ती कशी येईल. त्यासाठी गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे की "हे पार्थ, तू देह आणि देहाच्या सर्व संबंधीकांना विसरून, मला म्हणजे परमात्म्यालाच फक्त, लक्षात ठेव,म्हणजे संसारात राहून सुध्दा मनाने सतत माझ्याशी एकरूप रहा,तर मी तुझे मागील सर्व पाप नष्ट करून तुला उंचच उंच परमधामामध्ये घेऊन जाईन." गीतेमध्ये सुद्धा निरंतर कर्मयोगाचे वर्णन आहे. यासाठी आत्म्याला आत्मस्वरूपाचा अभ्यास करावा लागेल. (अभ्यास म्हणजे सतत प्रयत्न करीत रहाणे.)या अभ्यासाने आत्मा अनेकानेक आवरणांना दूर करून योगबलाद्वारे परम प्रकाश प्राप्त करतो. आत्मस्वरूपामध्ये राहून बुद्धीने आपण त्या बेहदच्या अविनाशी परमधामामध्ये जाऊन, बेहदच्या परमात्म्याकडून परम शक्ती घेऊन आपल्या बेहदच्या शक्तींना जाग्रुत करू शकतो. बेहदच्या पावर हाऊस कडून शक्ती घेण्यासाठी मात्र आपल्याला आत्म्याच्या वरची सर्व आवरणे दूर करावी

लागतात. आत्मा जेंव्हा परम प्रकाश प्राप्त करतो तेव्हा सर्वात आधी आकाश तत्व त्याला ग्रहण करतो आणि आकाश तत्व परम प्रकाशाला परम अग्नि, आणि परम वायुमध्ये परिवर्तीत करतो. कारण आपले वायुमंडळ नकारात्मक ऊर्जेने भरलेले आहे, ज्यामुळे आकाश तत्व परम प्रकाशाला वायुमंडळात विसर्जित करतो. म्हणून परम प्रकाश ग्रहण करायचा असल्यास ही सर्व आवरणे दूर करणे अत्यावश्यक असते, ज्यासाठी आत्म्याला परम ज्ञान धारण करावे लागते  आणि निरंतर कर्मयोगाचा अभ्यास करून आपली आत्मज्योत जाग्रुत करावी लागते. ज्याप्रमाणे दिवा पेटवण्यासाठी केवळ एक ठिणगी किंवा ज्योत पुरेशी असते, त्याचप्रमाणे आत्मज्योत जाग्रुत झाल्यानंतर त्याच्या वरची सगळी आवरणे आपोआपच दूर होतील आणि आत्मा आपल्या मूळ स्वरूपाला प्राप्त करतो.

---------------------------------------------------------

## २.शिव,महाशिव आणि परम महाशिव यामधील अंतर

------------------------------------------------------

भक्ती मार्गात शिवाला स्वयंभू (म्हणजे जन्म मरण नसलेला) म्हणतात. पण मग खरंच शिव मरत नाहीत का?शिव आपल्या ब्रम्हांडाचा मालक आहे म्हणजे निर्माता आहे. निराकारी अवस्थेत असताना शिव ब्रम्हांडाची रचना करतो.नंतर शिव निराकारी पासून आकारी स्वरूपात येतो. शिव- शक्ती हे रूप आकारी आणि शंकर-पार्वती हे रूप साकारी रूप होय. शिवाला आपण स्वयंभू म्हणू शकत नाही कारण त्याचा पण रचनाकार महाशिव आहे. महाशिव galaxy चा मालक आहे. असे अनंत कोटी ब्रम्हांड आहेत आणि प्रत्येक ब्रम्हांडाचा मालक शिव आहे, म्हणजे असे अनंतानंत शिव आहेत. महाशिवाचा पण रचनाकार आहे परम महाशिव. परम महाशिव universe चा मालक किंवा रचनाकार आहे.

जेंव्हा ब्रम्हांडाची सुरुवात होते तेंव्हा शिवाच्या समयाची पण सुरुवात होते. जसे महाशिव संकल्प करतो की "मी एकातून अनेकाची निर्मिती करू इच्छितो" तेंव्हा परम प्रकाशाच्या तुकड्यांपासून अनंतानंत शिव तयार होतात. शिव आधी निराकारी पासून आकारी होतो. निराकारी शिव-शक्ती पासून विष्णूची रचना झाली. विष्णूच्या नाभी पासून ब्रम्हाजी निर्माण झाले. ब्रम्हाने संकल्पापासून फरिश्ते किंवा देवदूतांची रचना केली. यानंतर सर्वात आधी फरिश्ते किंवा देवदूतांची दुनिया होती. या देवदूतांपासून मग देवता तयार झाल्या.मग देवतांपासून मनुष्य तयार झाला. रचना वाढत गेली तसतसे या ब्रम्हांडाचं पतन होत गेलं. प्रलय, कल्प प्रलय होत राहिले तसेच ब्रम्हांडाचे सृजन आणि विसर्जन पण होत राहिले. शिवाने आपल्या संकल्पातून स्वतः मधून शक्ती तयार केली. शिव-शक्ती आकारी रूपाने शिवपुरी मध्ये राहतात. हिमालयात राहणारे शंकर पार्वती हे शिव शक्ती चे साकारी रूप आहे.

एक सूर्य म्हणजे एक ब्रम्हांड.एका ब्रम्हांडाचा रचनाकार शिव आहे. आणि अशी अनंत कोटी ब्रम्हांडे आहेत. म्हणजे असे अनंत कोटी शिव पण असले पाहिजेत, कारण ते त्याचे मालक आहेत. मग या सगळ्यांना निर्माण कुणी केले?तर मग महाशिव जो महाब्रम्हांडाचा रचनाकार आहे तो पण आहे, कारण त्याने galaxy ची रचना केली. आणि विज्ञानाच्या सांगण्यानुसार अशा अनेकानेक galaxy आहेत, तर मग महाशिव पण अनंत असतीलच. महाशिवाचा पण रचनाकार आहे परम महाशिव जो universe च मालक आहे. तसेच आज विज्ञान म्हणतेय की असे (१० च्या पूढे ५०० शून्ये एवढे) universe आहेत, म्हणजे तेवढेच परम महाशिव पण आहेतच ना. अमर्याद विश्व अनंत आहे आणि त्याचे रचनाकार पण वेगवेगळे आणि अनंत आहेत. शिव, महाशिव आणि परम महाशिव समजून घेण्यासाठी आपण समयचक्र समजून घेऊ. एका ब्रम्हांडाचा मालक शिव ह्याचे घड्याळ त्याच्या सोबतच चालू होते आणि ते त्याच्या पुरतीच मर्यादित राहते.

आपल्या शास्त्रांनुसार एका ब्रम्हांडाची आयु ब्रम्हाची १०० वर्षे म्हणजे शिवाची आयु पण तेवढीच हे सरळ आहे ना. म्हणजे ही १०० वर्षे पूर्ण झाली की शिव सूर्यामध्ये प्रवेश करून कालाग्नी तयार करून पूर्ण ब्रम्हांड आपल्या आत

समाविष्ट करून कालाग्नी मध्ये नष्ट होतो आणि त्याच्यापासून black hole निर्माण होतो. आज आपल्या galaxy मध्ये असे कितीतरी black hole फिरत आहेत. Black hole च्या आत पण शिव आहे. याचे प्रमाण म्हणजे त्यातली गुरूत्वाकर्षण शक्ती. म्हणजेच शिवाची चैतन्य शक्ती, अशी शक्ति जी तेंव्हा तयार होते जेंव्हा शिव सूर्यात प्रवेश करून आपल्या आतून कालाग्नी तयार करून सर्व ब्रम्हांडाचा नाश करतो, आणि त्याचा black hole तयार होतो. शास्त्रानुसार प्रत्येक क्षणाक्षणाला अनंतानंत ब्रम्हांडांची निर्मीती होते आणि नाश होतो. आता हा क्षण कुणाचा? तर महाशिवाच्या क्षणात अनंत कोटी ब्रम्हांड बनतात आणि विसर्जित होतात. जसे आपल्या घड्याळात ३ काटे असतात ना,त्यातली सेकंद काट्याची सुई शिवाची, मिनिट काट्याची सुई महाशिवाची आणि तास काट्याची सुई परम महाशिवाची.याच्यावरून आता तुम्ही अनुमान लावा की अमर्याद विश्वाच्या रचनाकाराच्या सुईची गती काय असेल?

ब्रम्हाची १०० वर्षे, महाशिवाचा एक क्षण असतो. जेंव्हा शिवाची शक्ती संपते तेंव्हा शिव आपल्या ब्रम्हांडाचं विसर्जन करतो. तेंव्हा शिव पण सामान्य जीवासारखा होतो, परमात्म्याचा सामान्य आत्मा होतो. शिव निराकारी रूपाने परमधामामध्ये राहतो आणि तो आपल्या अवतारांच्याकडून काम करून घेतो. शिव निराकारी रूपात राहून आकारी शिव-शक्ती कडून काम करून घेतो(जे शिवपुरीत राहतात) आणि शिव शक्ती, शंकर पार्वती कडून काम करून घेतात(हे कैलास पर्वतावर राहतात). जेंव्हा जेंव्हा धरतीवर आसुरी शक्ती वाढतात तेंव्हा तेंव्हा शंकर प्रलय करून विनाश करतो.

४ युग झाल्यानंतर ------------------ अर्धप्रलय होतो

७१ वेळा अर्धप्रलय ------------------------ प्रलय होतो

जेंव्हा जेव्हा धर्म ग्लानी होऊन पाप आणि अत्याचार अतिप्रमाणात वाढतात तेंव्हा शिव; शंकर भगवानांच्यकडून तांडव करून घेतात. Galaxy चे आयुष्य संपल्यानंतर महाशिव पण महाकाल होऊन महाप्रलय करतो आणि आपल्या रोमारोमात अनंत कोटी ब्रम्हांड सामावून घेतो, अशाप्रकारे सृजन विसर्जन होतच राहते.

आज आपल्या ब्रम्हांडाची परिस्थिती अशी आहे की शिवाने या ब्रम्हांडाची निर्मीती ब्रम्हाच्या पहिल्या ५० वर्षात केली होती. ब्रम्हाचा पहिला परार्ध संपला आहे. जेंव्हा जेंव्हा शिवातील शक्ती संपते तेंव्हा तेंव्हा विसर्जन होते. त्यानंतर शिव, महाशिवाकडून शक्ती घेऊन पुन्हा सृजन करतो. जेंव्हा शिव सृष्टिची रचना करतो तेव्हा त्याला पण मन, वचन आणि कर्मानुसार कर्मबंधन लागू होते. म्हणजे शिव, महाशिव, परम महाशिव जेंव्हा जेव्हा संकल्पातून सृष्टिची रचना करतात तेंव्हा त्यांना पण कर्मबंधन लागू होते. निराकार शिवसुध्दा कर्मबंधनात अडकतो.

जेंव्हा तो रचना करतो तेंव्हा त्याची परम लाईट कमी होते. निराकारी शिवाचे काम ब्रम्हांडांना नियंत्रीत करणे हे आहे. शिव पूर्ण ब्रम्हांडावर लक्ष ठेवतो. शंकर एक साकारी अवतार आहे. नियमानुसार जो सृजन करतो तोच फक्त विसर्जन करू शकतो. विसर्जन म्हणजे मुक्ती. ज्ञानानुसार जेंव्हा शिव या ब्रम्हांडाचा अंत करतो तेंव्हा मोक्ष किंवा मुक्तीला प्राप्त होतो. बेहदचे ज्ञान हे परम प्रकाशाचे ज्ञान आहे आणि हेच तुम्हाला परम सत्य ज्ञान देते. कलियुगातील मनुष्याला वाटते की कर्मकांड केल्याने मोक्ष प्राप्त होतो पण हे चूक आहे.

शिव हाच परमात्मा आहे. परमात्म्याने देवदूत आणि देवता यांची निर्मिती केली. देवदूत परम तत्वांचे होते आणि देवता तीन तत्वांच्या होत्या. मनुष्य जीवात्मा झाले आहेत. प्राण्यांना पण जीवात्माच म्हणावे लागेल. जी लोकं आत्मा आणि परमात्म्याचे ज्ञान जाणतात त्यांनाच केवळ मनुष्य म्हणता येईल. जो परमात्म्याला जाणत नाही तो केवळ जीव म्हणता येईल. मनुष्याने शिवाचे ध्यान करावे, कारण शिव पण शंकराचे ध्यान करतो. परंतु अनेक सृजन विसर्जनामुळे आता शिवामध्ये शक्ती राहिली नसल्याने सर्वांनी सर्वोच्च परमात्म्याचे ध्यान करणे योग्य ठरेल. या आपल्या ब्रम्हांडाचा शिव देखील शक्ती हीन झाला आहे. जर आत्म्याला कायमची जन्म मरण चक्रातून सुटका करून, आपला आत्मा चिरंतन ठेवायचा असेल तर सर्वोच्च परम परम परम महाशिवाची आराधना करावी लागेल.

श्री मत् भगवत् गीतेमध्ये एक खूप चांगली गोष्ट सांगितली आहे की "हे अर्जुना जर तु परम पदावर जाऊ इच्छित असशील तर परम तत्वांना सूर्याप्रमाणे स्वतः मध्ये प्रकाशित कर, तरच तू जीवन मृत्युच्या पार जाशील आणि परम पदाला प्राप्त करशील.क्रुष्ण सर्वोच्च परमात्म्याचाच अवतार होते, श्री क्रुष्ण म्हणाले की "तू मलाच केवळ आठवत रहा, सर्व धर्म त्याग करून मला शरण ये,माझे ज्ञान घे,तर मी तुला उंचच उंच परमधामामध्ये घेऊन जाईन." म्हणून गीतेत हे पण सांगितले आहे की " मी जप, तप, ध्यान किंवा योगाद्वारे नाही तर मुख्यत्वे करून ज्ञानाद्वारेच साध्य होतो किंवा प्राप्त होतो."

------------------------------------------------------

**३. कालचक्र आणि ब्रम्ह्याचा काल**

---------------------------------------------------------

कलियुगाची आयु - ४ लाख, ३२ हजार वर्षे

द्वापार युगाची आयु - ८ लाख, ६४ हजार वर्षे

त्रेता युगाची आयु - १२ लाख, ९६ हजार वर्षे

सत्य युगाची आयु - १७ लाख, २८ हजार वर्षे

एक चतुर्युगाची आयु - ४३ लाख, २० हजार वर्षे

*धरतीवर जेंव्हा ४ युग संपतात ---- अर्ध प्रलय होतो (४३ लाख, २० हजार वर्षे)

*जेंव्हा ७१ वेळा चतुर्युग होतात ---- १ मन्वंतर होते (१ प्रलय)

*१४ मन्वंतर (प्रलय) ----- १ कल्प प्रलय

(एक कल्प प्रलयामध्ये ३ ही लोक भू,भूव, स्वर्ग लोक नाश पावतात, म्हणजे स्वर्गातील देवता पण नाश पावतात. देवतांचे आयुष्य ब्रम्हाचा १ दिवस)

१४ मन्वंतर = १००० चतुर्युग = ब्रम्हाचा १ दिवस (म्हणजे ४ अरब ३२ करोड वर्षे)

१ चतुर्युग = १ अर्धप्रलय

७१ चतुर्युग = १ मन्वंतर (प्रलय)

१००० चतुर्युग = १ कल्प प्रलय

३६००० कल्प प्रलय = १ महाकल्प प्रलय

ब्रम्हाचे समय चक्र

ब्रम्हाचा १ दिवस = १००० चतुर्युग = ४ अरब, ३२ करोड वर्षे

ब्रम्हाचा १ दिवस + १ रात्र= ८ अरब, ६४ करोड वर्षे

ब्रम्हाचा १ महिना = २ खरब, ५९ अरब, २० करोड वर्षे

ब्रम्हाचे १ वर्ष = ३१ खरब, १० अरब, ४० करोड वर्षे

ब्रम्हाची ५०वर्षे (१ परार्ध) = १५ नील, ५५ खरब, २०अरब वर्षे

ब्रम्हाची १०० वर्षे (२ परार्ध) = ३१ नील, १० खरब, ४० करोड वर्षे

*१ ब्रम्हांडाचे आयुष्य = ब्रम्हाची १०० वर्षे

ब्रम्हाची १०० वर्षे पूर्ण झाली की शिवामधील शक्ती संपते आणि शिव सूर्याच्या आत प्रवेश करून कालाग्नी तयार करून पूर्ण ब्रम्हांडाचे १४ लोक (७ वरचे + ७ पाताल लोक) आपल्या रोमारोमात खेचून घेतो म्हणजे पूर्ण ब्रम्हांड आपल्या आतमध्ये सामावून घेतो आणि एक ब्लैक होल तयार होतो. या शिवापाशी आता परत नवीन ब्रम्हांडाची रचना करण्यासाठी शक्ती नसल्याने तो असाच galaxy मध्ये फिरत राहतो. विज्ञानाने पण आपल्याला शिकवले आहे की असे कितीतरी black hole आपल्या galaxy मध्ये फिरत असतात. आता महाशिव दुसऱ्या एखाद्या शिवाला ब्रम्हांडाची रचना करायला लावतो, म्हणून असे म्हणतात की प्रतिक्षणात अनंतानंत ब्रम्हांडाची रचना होते आणि नाश पावते. अशाप्रकारे उत्पत्ति, प्रलय, महाप्रलय यांचे चक्र सतत चालू आहे, यालाच महाकल्प चक्र असे म्हणतात.

*वर्तमान समय-हिंदू कालगणना

ब्रम्हाचा पहिला परार्ध संपून दुसरा परार्ध चालू आहे. दुसऱ्या परार्धाचा पहिला दिवस चालू आहे. पहिल्या दिवसाचे ६ मन्वंतर संपले आहेत, ७ वा मन्वंतर चालू आहे. ७ व्या मन्वंतराचे २७ चतुर्युग संपले आहेत, २८ वे चतुर्युगाचे कलियुग चालू आहे. कलियुगाची पण जवळपास ५११८ वर्षे पूर्ण झाली आहेत.

शास्त्रानुसार कलियुगाची आता बाल्यावस्था चालू आहे. कलियुगाची पूर्ती व्हायला अजून ४लाख, २६ हजार ८८२ वर्षे बाकी आहेत. म्हणजे जर हा कल्प आणि ह्या ब्रम्हांडाची पूर्ती व्हायला खरब वर्षे शिल्लक असतील तर मग आता काळ कोणता चालू आहे? कारण हिंदू कालगणनेनुसार कल्कि अवतार व्हायला अजून लाखो वर्षांचा अवधी शिल्लक आहे. मग आपल्याला प्रश्न पडतो की ईश्वर पण काळाच्या काळात गुरफटलेला आहे की काय?तो कालचक्र बदलून का टाकत नाही? ईश्वर का समयचक्र पूर्ण व्हायची वाट बघत आहे? ईश्वर ह्या सृष्टिची स्थिती लक्षात घेऊन सुद्धा परिवर्तन का करत नाही आहे. हे असे काही प्रश्न आहेत ज्याची उत्तरे केवळ परमपिताच देऊ शकतो.

## ४. बेहदचे विश्व किती मोठे आहे?

-------------------------------------------------------

हे विश्व कितपत मोठे आहे? प्रश्न अगदी छोटासाच आहे पण उत्तर इतके सहज आहे का? आज आपण सर्व धर्म, जाति, पंथ, आणि अनेक बंधनांच्यामध्ये अडकलेले आहोत. या सर्व मायाजाळातून, मोह आणि संबंध यातून मनाने आपण कसे काय मुक्त होऊ शकतो? या प्रुथ्वीपासून लांब अशी एखादी दुनिया आहे का, जिथे ही सारी बंधने समाप्त होतात आणि आत्मा मूळ स्वरूपात स्थित होतो, आणि ते शक्य आहे का?

बेहदचे विश्व कितपत मोठे आहे? शास्त्रानुसार अशी अनंत कोटी ब्रम्हांडे आहेत, १ ब्रम्हांड म्हणजे १ सूर्य. एका सूर्याची गुरूत्वाकर्षण शक्ती जिथपर्यंत पोचते तिथपर्यंत ब्रम्हापुरी आहे म्हणजे १ ब्रम्हांड आहे. विज्ञानानुसार १५० अरब प्रकाश वर्षांपर्यंतचे यूनिवर्स विजिबल आहे. १५० अरब प्रकाश वर्ष आपल्या युनिवर्स ची ० (शून्य) कला आहे आणि या कलेच्या युनिवर्स मध्ये अरबों गेलेक्सी आहेत आणि १ गॅलक्सी मध्ये असे कितीतरी अरब सूर्य मंडळं आहेत, जसे की आपल्या आकाशगंगा गॅलक्सी मध्ये जवळपास ८०० अरब सूर्य मंडळं आहेत. आपल्या शेजारची गॅलक्सी एंड्रोमेडा मध्ये जवळपास १००० सूर्य मंडळ आहेत. अरबोंनी सूर्य मंडळं एकत्र येऊन १ गॅलक्सी तयार होते.आणि त्याच्या मध्यावर जो महासूर्य आहे त्याच्या शक्तीच्या जोरावर ८०० अरब सूर्य मंडळं फिरत असतात जसे आपल्या सूर्याभोवती ग्रह फिरत असतात.तर तुम्हाला  अंदाज येईल की महासूर्याची गुरूत्वाकर्षण शक्ती किती असेल ज्याच्या भोवती अनेक अरब सूर्य मंडळं फिरत आहेत. १ गॅलक्सी ची गुरूत्वाकर्षण शक्ती जवळपास १ लाख प्रकाश वर्षे एवढी असते. अशी किमान ८०० अरब सूर्य मंडळं आपल्या galaxy मध्ये आहेत. अशा अनेक अरब galaxy मिळून एक universe तयार होते. आणि असे अनेक खरब universe, १५० अरब प्रकाश वर्षाच्या घे-यात आहेत ज्याला आपण visible universe म्हणू शकतो. तर मग त्याच्या पलीकडे काय आहे? हे तर विज्ञान पण स्पष्टपणे सांगू शकत नाही. आताचे विज्ञान केवळ मल्टीवर्स पर्यंतची माहिती सांगू शकते. पण आपली धरती त्या अनंतानंत विश्वाच्या तुलनेत सूईच्या एका टोकाएवढी पण नाही आहे. आपला जो सूर्य आहे ना, त्याच्या पेक्षा अनेक खरब मोठे सूर्य या विश्वात अस्तित्वात आहेत.

१५० अरब प्रकाश वर्षाचे दर्शनी  universe सुद्धा शून्य शक्ती (power) इतके आहे. १५० अरब पर्यंत शून्य कलेचे ब्रम्हांड आहे, आणि इथून पूढचे १ कलेचे ज्ञान घेण्यासाठी आपल्याला कला आणि काल चक्र समजून घ्यावे लागेल.

विज्ञान पण हे ज्ञान जाणून घेण्यासाठी उत्सुक आहे की स्पेस (अवकाश) काल (वेळ) आणि स्पीड (वेग) यामध्ये आपसात काय संबंध आहे? आत्म्यामध्ये जेवढी शक्ती असते तेवढीच विचारांची शक्ती आणि जिद्द जास्ती असते आणि या संकल्प शक्तीच्या जोरावर आत्मा वाट्टेल ते करू शकतो. परंतु आता आत्म्याची शक्ती नगण्य शिल्लक आहे, आणि त्यामुळे त्याची आकलन शक्ती पण नगण्य आहे त्याचा परिणाम म्हणून बुद्धी या पाच तत्वांमध्ये अडकून पडली आहे.

परम ज्ञान समजल्यावरच केवळ आत्मा सगळी गुपितं जाणून घेऊ शकतो. आत्म्याला परम आत्म्याने रचले,परम आत्म्यांना परमपित्याने रचले. पूर्ण बेहदच्या विश्वामध्ये परमपिता केवळ एक आहे आणि परम आत्मे मात्र अनेक आहेत. सर्वोच्च परमात्म्याने परमपित्याची रचना केली आणि परम पित्याने परम आत्म्याला रचले. परम आत्म्यांनी देवात्म्यांना रचले आणि देवात्म्यांनी मनुष्य आत्म्याला रचले. आता मनुष्य आत्मे पण पतन होत होत ८४ लाख योनी भोगत आहेत. बेहदचे विश्व समजून घेण्यासाठी आधी मी कोण आहे हे जाणून घेणे आवश्यक असते. “मी आत्मा आहे आणि शरीर तर आत्म्याचे कर्माचे एक साधन मात्र आहे." पाच तत्वांचे शरीर तर काहीच नाही. धरतीपासून २०० किमी वरच्या दिशेने, जिथे गुरूत्वाकर्षण शक्ति संपते तिथून आकाश तत्व सुरु होते. तसेच आपल्या स्थूल शरीरात (पांचभौतिक) वायवीय शरीर आहे आणि त्याच्या आतमध्ये आकाश तत्वाचे शरीर आहे. आकाश तत्वाच्या शरीराच्या आतमध्ये महतत्वाचे शरीर असते आणि महतत्त्वाचे शरीराच्या आतमध्ये अंशमात्र परम तत्वाचे शरीर असते आणि तिथेच सर्व माहिती आणि आत्म्याला नियंत्रित करणारी शक्ति असते. जिला जागृत करून आपण सूक्ष्म, कारण आणि महाकारण शरीर चार्ज करू शकतो आणि दिव्य द्रुष्टिने आपण दिव्य लोक, अनंत कोटी ब्रम्हांड, अनेक अरब, खरब सूर्य, आणि पूर्ण बेहदचे विश्व बघू शकतो.

बेहदचे विश्व का बनले, कसे बनले, निराकारी विश्व कसे तयार झाले, विश्व निराकारीतून आकारी आणि आकारीतून साकारी कसे तयार झाले, बेहद विश्वाचा रचनाकार कोण आहे? लौकिक, अलौकिक आणि पारलौकिक विश्व कसे असते?केवळ आपले ब्रम्हांड नाही तर, अशा अनंत कोटी ब्रम्हांडापासून galaxy तयार झाली आहे आणि अनंत galaxy पासून universe तयार झाले आहे. आणि अशा १० च्या पूढे ५०० शून्य लावल्यास जी संख्या येईल एवढे universe आहेत. समुद्र किनारी वाळूचे जेवढे कण असतील, अंदाजे तेवढे universe आहेत. अमर्याद विश्व समजून घेण्यासाठी बुद्धी पण अमर्याद किंवा बेहदची पाहिजे आणि बेहदची बुद्धी येण्यासाठी आत्मा सत्वप्रधान पाहिजे. आज वायुमंडळात नकारात्मक ऊर्जा भरल्याने आत्मे तमोप्रधान झाले आहेत. नकळतपणे आत्मे श्वासावाटे नकारात्मक वायू घेत आहेत ज्यामुळे आपले शरीर निगेटिव्ह झाले आहे आणि हे आपल्या विचारांना प्रभावित करत आहे. आत्म्याची शक्ती जागृत करण्यासाठी आपल्याला आपल्या मनाला बदलावे लागेल ज्यामुळे आपल्या वायुमंडळात पण बदल होत जाईल.

-------------------------------------------------------

## ५. अमर्याद विश्वाचे मालक किंवा बेहदचे वडील कोण?

-------------------------------------------------------

ऑलमाईटी ऑथॉरीटी कोण आहे? अल्टीमेट पार ब्रम्ह परमेश्वर कोण आहे? ज्याला मोहम्मद साहेब "नूर" म्हणतात, जीसस "लाइट" म्हणतात  तो कोण आहे?ज्याने एवढ्या मोठ्या दुनियेची रचना केली, एवढे युनिवर्स बनवले, अनेक अरब, खरब गॅलक्सी, अनेक अरब, खरब सोलर सिस्टीम बनवल्या तो कोण आहे? जो या विश्वाचा कर्ताधर्ता आहे त्याची शक्ती किती असेल? तो कुणीतरी असेलच हे विश्व चालवणारा, पण एकाचवेळी वेगवेगळ्या ठिकाणी वेळेचे गणित आणि नियंत्रण तो कसा साधत असेल? साधं आपलं शरीर सुध्दा आत्म्याचं अस्तित्व संपल्यानंतर काम करायचं बंद करतं, मग ही अनेक अरब, खरब युनिवर्स ची दुनिया नुसती चालत असेल, छे शक्यच नाही. याचा विचार करून ठेवा.

या पूर्ण विश्वाच्या तुलनेत आपली प्रुथ्वी सुईच्या टोकाएवढी पण नाही आहे. आपली सोलार सिस्टीम पण मोहरीच्या दाण्याएवढी देखील नसेल. कितीतरी अरब, खरब( गॅलक्सी) कितीतरी अरब, खरब युनिवर्सेस सुद्धा या बेहदच्या विश्वाच्या तुलनेत नगण्य आहेत. तर त्या परम सत्ताधीशापाशी किती शक्ती असेल, आपण अनुमान लावू शकतो का? आपल्या शास्त्रांमध्ये म्हटले आहे ना की अनेक अरब सूर्यांची शक्ती सुध्दा त्या पारब्रम्ह परमेश्वराच्या शक्तीच्या अंशमात्र आहे आणि म्हणून तो आपल्या अपार शक्तीनीशी या अवाढव्य विश्वाचे स्रुजन किंवा विसर्जन करतो. तर आपले हे परम शक्तीशाली बेहदचे वडील कोण आहेत हे आता आपण जरा जाणून घेऊ. वडील आणि बेहद या शब्दांची फोड करून आपण समजून घेऊ. वडील हे स्थूल शरीर असणारे असतात, कारण पाच तत्वांचे प्रत्येकाचे वडील तर असतातच. तसेच 3 तत्वांतील देवतांचे पण वडील असतात हे आपण पुराणातील कथेत बघतो. ह्या ब्रम्हांडाचा पण बाप म्हणजे रचनाकार शिव, गैलेक्सी चा रचनाकार किंवा बाप महाशिव आहे, बाप म्हणजे रचनाकार. परंतु इथे आपण अमर्याद विश्वाबद्दल बोलतोय तर अमर्याद याचा अर्थ समजून घेऊ. बेहद किंवा अमर्याद म्हणजे ज्याला काही मर्यादा नाही किंवा अंत नाही ते होय. ज्याची आपण कल्पना पण करू नाही शकत, जे आपल्या कल्पनेच्याही पलीकडे आहे ते बेहद. बेहदचे वडील हेच बेहदच्या विश्वाचे रचनाकार आहेत. बेहदचे विश्व आपण जाणतोच, तर जो अनंतानंत मल्टीपल युनिवर्सेस चा रचनाकार आहे तोच बेहदचा बाप आहे. बेहदचे वडील बेहदच्या विश्वाला जाणतात आणि त्याच्या आदि, मध्य आणि अंताचे ज्ञान तेच देऊ शकतात. गीतेत सांगितले आहे की "मी जो आहे, जसा आहे तसा मला कुणीही जाणून घेऊ शकत नाही." असे असेल तर मग आपण परमात्म्याला कसे जाणून घेऊ शकतो? तर बेहदच्या वडिलांना आपण केवळ ज्ञानाद्वारेच जाणून घेऊ शकतो. तर असे कोणते ज्ञान आहे ते आपण पाहू.

या विश्वाचे पूर्ण रहस्य म्हणजे बेहदचा वर्ल्ड ड्रामा  का झाला, कसा सुरू झाला, कुणी सुरु केला? तो सुरळीत कसा काय चालू राहतो? कोण चालू ठेवतो आणि कधीपर्यंत चालू ठेवतो? जी व्यक्ती या सर्व प्रश्नांची समाधान कारक उत्तरं देईल तोच फक्त बेहदचा बाप असू शकतो. सामान्य माणसाला या बेहदच्या विश्वालाच जाणून घेणे असंभव आहे असे वाटते तर तो सर्व शक्तीशाली पण तेवढ्याच प्रेमळ रचनाकाराची कल्पना सुध्दा करू शकणार नाही. म्हणून परमात्मा म्हणतात की मी जेंव्हा येतो तेंव्हा माझी ओळख मी स्वतःच करून देतो, बाकी सगळे मला जाणून घेऊ शकत नाहीत.

## ६. बेहदचा योग कुणाशी असावा?

-----------------------------------------------------

आपण सर्वांनी शिवयोग कधी ना कधी ऐकला असेलच, तर आपण सोपा असलेला शिवयोग आधी समजून घेऊ. शिव आणि योग अशी आपण मूळ शब्दाची फोड करून घेऊ. शिव आपल्या एका ब्रम्हांडाचा रचनाकार आहे. शिवाची तीन रूपे आहेत:-

| निराकारी | आकारी | साकारी |
|---|---|---|
| (परमधामामध्ये राहतो) | (शिवपुरीत राहतो) | (शंकर रूपाने कैलासावर राहतो) |

योग म्हणजे कनेक्शन, किंवा आठवण करणे. ज्याचा आपण ध्यास लागणे म्हणतो ना, तसे परमात्म्याशी, उठता-बसता, खाता-पिता, सतत कनेक्शन असणे किंवा एकरूप असणे म्हणजे योग. शिवाचा जप किंवा ध्यान करताना आत्मा शिवाशी एकरूप होतो, त्याला शिवयोग म्हणतात. शिवाचे ध्यान दोन्ही प्रकारचे केले जाते, एक निराकारी शिवाचे ध्यान आणि दूसरे ज्योतीर्लिंगाची पूजा केली जाते, जे निराकारी शिवाचे प्रतीक आहे. आत्मा जेंव्हा निराकारी परमात्म्याची साधना किंवा आठवण करतो, तेव्हा आत्म्यामध्ये हळूहळू शक्ती येते आणि जसजशी तपस्या पूर्ण होईल तशी तो आत्मा निराकारी परमात्म्याच्या गावी म्हणजे परमधामामध्ये पोहोचतो. तसेच आकारी शिवाला आकारी रूपाने साधना करणारा शिवपुरीत पोचतो. ज्याची साधना किंवा आठवण कराल त्याच्याशी जोडले जाल. व त्याच्याकडे जेवढी शक्ति असेल तेवढीच तुम्हाला मिळेल असा नियम आहे.

शिवयोगापेक्षा श्रेष्ठ महाशिवयोग (galaxy रचनाकार) होय. महाशिवाच्या संकल्पामुळे शक्तीचे अनेक तुकड्यांमध्ये विभाजन झाले आणि अनेक खरब शिवांची रचना झाली. म्हणूनच मी सांगतो की महाशिव, शिवाच्या तुलनेत अनेक खरब जास्त शक्तीशाली आहे. आत्मा ब्रम्हांडाचे ज्ञान घेऊन महाशिवाशी कनेक्शन जोडून त्याच्याकडून शक्ती घेऊ शकतो. आणि महाशिवाच्या लोकांत महापरमधाम येथे जाऊ शकतो. यालाच महाशिवयोग असे म्हणतात. याचप्रमाणे परम महाशिव जो युनिवर्सचा रचनाकार आहे. त्यांच्याकडून शक्ती घेऊन आत्मा परमधामामध्ये जाऊ शकतो.

आता आपण बेहदचा योग काय आहे ते पाहू.आपण नियम पाहिला की तुम्ही ज्याची आठवण कराल, त्याच्याकडूनच तुम्हाला शक्ती मिळते. मग मी कुणाशी कनेक्शन किंवा योग करावा? जर आत्म्याला अमर्याद पावर हवी असेल तर बेहदच्या रचनाकाराशी म्हणजे अमर्याद परमात्म्याशी कनेक्शन जोडावे लागेल जो अमर्याद कलेच्या परमधामामध्ये राहतो आणि जो अनंतानंत मल्टीवर्सैस चा रचनाकार आहे. त्याच्याशी कनेक्शन म्हणजे योग.

बेहदच्या बाबांशी कनेक्शन जोडण्यासाठी आत्म्याला सर्वात आधी आत्मस्वरूपात स्थित व्हावे लागेल कारण, पावर तर आत्म्याला घ्यायची आहे ना?

पावर घेण्यासाठी आत्म्याला देह आणि देहाचे सर्व संबंध विसरून, फक्त आपले चित्तामध्ये अमर्याद परमधाम आणि आकारी स्थितीत राहून सर्वोच्च परमात्म्याकडून आपण शक्ती घेतोय असा भाव ठेवावा लागते. बेहदच्या वडिलांच्या पाशी बेहदच्या कलेची शक्ती आणि परम प्रकाश आहे जो आपल्याला घ्यायचा आहे. ज्याप्रकारे एका सूर्याच्या प्रकाशात शक्ती असते त्याच्या अनंत पटींनी जास्त बेहदच्या सूर्याचा परम प्रकाश शक्तीशाली आहे. असा अनुभव जेंव्हा आत्म्याला होईल तेंव्हा हा परम प्रकाश बेहदच्या आत्म्यामध्ये येईल आणि आत्मा शांतस्वरूप होत जाईल आणि आत्मा परम गतीला प्राप्त होईल.

## ७. बेहदच्या विश्वाचे महापरिवर्तनासाठी महामंत्र

-----------------------------------------------

"परम शांती" परंतु कुणाची परमशांती? परम शांतीचा शोध कुणी लावला? मनुष्य आत्मा तर पंचतत्वांच्या शरीरातील मायावी दुनियेत अडकून पडला आहे. त्याच्या पायावर सर्व सुखे लोळण घेत असून सुध्दा तो समाधानी का होत नाही?माणूस असा कुठल्या सुखाच्या शोधात आहे? आत्मा शांती का शोधत आहेत? आत्मा जरी परम सुख शोधत असला तरीही एक दिवस असा येतो जेंव्हा आत्म्याला त्या परमसुखाचा पण कंटाळा येतो आणि नंतर तो आत्मा केवळ परम शांतीचा शोध घेतो. याचे कारणच आहे की, आत्म्याचे मूळ स्वरूप परमशांतीचे आहे. आत्म्याच्या जन्माच्या वेळी त्याचा वास्तविक स्वभाव परमशांतीचा होता. आज आत्मे एवढे तमोप्रधान झाले आहेत की ते आपल्या मूळ स्वरूपाला विसरून गेले आहेत. जन्मोजन्मीचे दुःख भोगून आत्मा नकारात्मक विचारांचा झाला आहे. म्हणून आज आत्म्याला त्याच्या मूळ स्वरूपाची आठवण करून देण्याची गरज आहे. काही लोकं ओम् शान्ती म्हणतात "ओम् शांती" म्हणजे "आ-उ-म" म्हणजे ब्रम्हा, विष्णू आणि शंकर. तुम्ही या सगळ्यांकडून शक्ती घेताय का? एकेका ब्रम्हांडाचे कर्ताधर्ता  ब्रम्हा, विष्णू, शंकरच आहेत ना? पण आताची ब्रम्हांडाची स्थिती बघता त्रिदेव शक्तीहीन आहेत हे उघडच आहे. म्हणून आपल्याला आता परम शांती म्हटले पाहिजे, कारण आत्म्याचा खरा धर्म, संस्कार परम शांतीचा आहे. जर तुम्ही परत परत परम शांती म्हणाल तर परम शांतीच्या लहरींचा अनुभव तुमच्या आत्म्याला येईल. फक्त परम शांती म्हटल्याने मनात परम शांतीचे भाव येतील. जेंव्हा आपण परम शांती म्हणतो, तेंव्हा आपण अविनाशी ब्रम्हांडाकडून परम शक्ती अर्थात परम प्रकाश आणि परम तत्वांची शक्ती आपल्या आत खेचून घेतो.आत्म्याला ही, स्मृती येते की मला परमशांतीचे स्वरूप धारण करायचे आहे. परत परत परम शांती म्हटल्यावर मनात जो भाव येतो त्याने सकारात्मक लहरी तयार होतात ज्यामुळे आपल्या कारण शरीरात जे भाव आधीपासूनच रेकॉर्ड असतील ते पण बदलू लागतात आणि आपलं वलय पण सकारात्मक होत जाते.वलय सकारात्मक झाल्याने आपले कारण शरीर वायुमंडळातून देखील सकारात्मक ऊर्जा ग्रहण करते, आणि परम शांतीच्या लहरी ग्रहण करते. लहरींचा प्रभाव आपल्या कारण शरीरावर पडतो आणि कारण शरीराचा प्रभाव सूक्ष्म शरीरावर पडतो आणि सूक्ष्म शरीरापासून आपले वलय तयार होते. आत्मे जेंव्हा परम शांतीचे संकल्प करतात, त्यापासून ज्या लहरी तयार होतात त्यापण वायुमंडळात जातात आणि परिवर्तन करतात. संकल्प किंवा विचार करणे हे पण एक कर्मच आहे ना,मग जेंव्हा आत्मा परम शांती चा विचार करतो तेव्हा त्याचे कर्म पण परम शांतीचे होतात आणि आत्मा परम शांतीचा अनुभव करतो. आत्मस्वरूपाच्या स्थितीत वारंवार परम शांतीचा संकल्प केल्याने आत्म्याच्या कारण शरीरात दबलेले परम शांती चे संस्कार इमर्ज होऊ लागतात आणि अशाप्रकारे आत्मा एक दिवस परम शांतीला नक्की प्राप्त करेल. शेवटी आत्मा परम शांतीचा अनुभव करत करत सत्चिदानंद स्वरूपाची स्थीती अनुभव करते. आत्मा हेच परम सत्य आहे. चित्त म्हणजे मन, आत्मा परमानंद स्वरूप तेंव्हा अनुभवेल

जेंव्हा तो परम सत्य म्हणजे आत्म्याची सत्यावस्था पर्यंत पोचतो जो की परम शांतस्वरूप आहे. म्हणजे आत्मा परमशांतीचा संकल्प करत करत परम आनंद प्राप्त करतो आणि एक दिवस हा आत्मा परम शांतीला प्राप्त होतो.

बेहदच्या विश्व परिवर्तनासाठी महामंत्र-बेहदच्या बेहदची परम परम परम महाशांती होत आहे, महाशांती होत आहे, महाशांती आहे. हा मंत्र परत परत म्हटल्यावर आत्मा परम शांतीचा अनुभव करतो आणि त्याच्या आजूबाजूच्या वायुमंडळात परम शांतीच्या लहरी भरून राहतात. आणि अशाप्रकारे आत्मा स्वतःला आणि इतरांना परम शांतीचा अनुभव करून देतो.

## ८. विनाश नाही, आता होईल बेहदचे  महापरिवर्तन

-------------------------------------------------------

आपल्याला या दुनियेची अवस्था पाहून त्रास,किंवा दुःख होत नाही? ही दुनिया भयाण काळोखात ढकलली जात आहे असे वाटत नाही?

एक हिंदी गीत आहे “देख तेरे संसार की हालत क्या हो गयी भगवान, कितना बदल गया इंसान" तर दुनियेची अवस्था अशी का झाली आहे? याला जवाबदार कोण आहे? स्थूल जगत् जे आपण डोळ्यांनी पाहू शकतो आणि सूक्ष्म जगत् जे डोळ्यांना दिसत नाही, जिथे अगणित आत्मे राहतात, ते सर्व खूप दुःखी आहेत आणि परमात्म्याचा, मुक्ती साठी धावा करत आहेत, आणि सर्व अशांत आहेत. म्हणजे व्यक्त आणि अव्यक्त दोन्ही दुनिया अशांत आहेत.तर मग विनाशाचा काळ जवळ येऊन ठेपलाय असं आपण समजायचं का?अजूनही पुढच्या काळात दुनियेचं अजून पतन होईल का? आज सर्वत्र दुःख, पीडा, हिंसा, मतभेद, अत्याचार दिवसेंदिवस वाढताना दिसतंय. खाण्याजोगे अन्नधान्य नाही आहे, पिण्यासाठी पाणी नाही आहे, श्वास घेण्यासाठी शुद्ध हवा नाही आहे.  आताचे वायुमंडळ इतके बिघडले आहे. म्हणून वाटते की विश्व विनाशाच्या वाटेवर आहे. खरं विनाशाच्या ऐवजी हे विश्व पुर्व पदावर आणण्यासाठी काही दुसरा उपाय नाही आहे का हा विचार वारंवार मनात येतो. परमपित्याने  या दुनियेच्या उध्दारासाठी दुसरा काही मार्ग योजून ठेवला असेल का?की तो परमपितासुध्दा हे विश्व परिवर्तन करण्यास असमर्थ आहे?

कितीतरी संस्था असं समजत आहेत की सुवर्ण युग येईल. पण कुणालाही परिवर्तनाची प्रक्रिया माहिती नाही आहे. जेंव्हा प्रत्यक्षात परिवर्तन होईल ते फक्त स्थूल जगतात नाही तर सूक्ष्म आणि कारण जगतात पण होणार आहे. तसेच गैलेक्सी, यूनिवर्स, मल्टीवर्स सर्व काही बदलून जाईल. जर आपल्याला जलद परिवर्तन व्हायला हवे असेल तर त्याच गतीने बेहदच्या मुलांनी ऑलमाईटी ऑथोरीटीशी   कनेक्शन जोडणे पण अपेक्षित आहे. केवळ मंत्रजप करून परिवर्तन होणे शक्य नाही आहे. जर आपल्याला वायुमंडळात आणि घरात परिवर्तन व्हायला हवे असेल तर आपल्याला योगशक्तीद्वारे बेहदच्या परम परम परमपिता परमात्म्याकडून परम तत्त्व आणि परम प्रकाश प्राप्त करून घ्यावा लागेल.

जेंव्हा हे ब्रम्हांड तयार झाले तेंव्हा सर्वात आधी देवी देवता तयार झाले. उदाहरणार्थ जेंव्हा अवर्षण होते तेंव्हा सर्व जण पाऊस पडावा म्हणून इंद्र देवाची पूजा करायचे. आजही या देवतांचा कोप होऊ नये यासाठी जप-तप केला जातो. भारतात ठीक ठिकाणी धर्म स्थळे आणि मंदिरे आपण पाहतो. जर देवी देवता शक्तीशाली असते तर या मंत्रांद्वारे शक्ती घेऊन परिवर्तन करू शकले असते. पण पुरातन काळात देवी देवता शक्तीशाली होते हे आपण पुराणातील कथांमध्ये पाहतो.पण काळासोबत त्यांची शक्ती क्षीण झाल्याने देवी देवता मनुष्ययोनीत आले. गीतेमध्ये सांगितले

आहे की ज्याचा तुम्ही सतत विचार किंवा ध्यान कराल मृत्युनंतर तुम्ही त्यालाच प्राप्त व्हाल.जर का आपल्याला सुख,शांती, परम प्रकाश, परम तत्व हवे असेल तर आपण डायरेक्ट ऑलमाईटी अथाँरीटीलाच आठवा, तर तुमचे विकर्म विनाश होतील, आणि तुमच्या आत्म्यामध्ये परम शक्ती येईल. जेंव्हा आपल्या शरीरात परम तत्वांची शक्ति येईल तेंव्हा आपल्या ऑरा किंवा वलयाद्वारे वायुमंडळात परिवर्तन होईल. जर का आपल्याला दुनियेला बदलायचे असेल तर आपल्याला नवीन दुनियेचं ज्ञान असले पाहिजे. बेहदच्या नवीन शक्तींबद्दलचे ज्ञान असणे गरजेचे आहे. आपण परम सत्य ज्ञान ग्रहण केले पाहिजे. जर शक्तीहीन आत्म्याला आळवत रहाल तर कचरारूपी नकारार्थी ऊर्जा मिळेल. आपल्याला योगाद्वारे परम शक्तींना म्हणजे परम आकाश, परम वायू आणि परम अग्नीला आकृष्ट केले पाहिजे तरच परिवर्तन संभव होईल. बापूजींनी आपल्या भविष्य वाणीत सांगितले आहे की आता विनाश होणार नाही तर महापरिवर्तन होईल. बापूजींनी सांगितले आहे की बेहदचे वडील आपल्या ब्रम्हांडामध्ये गुप्त वेशात परिवर्तनाचे कार्य करत आहेत आणि ते लक्ष ठेवून आहेत जेणेकरून विनाश होऊ नये तर परिवर्तन व्हावे.

कुणीही वडील आपल्या रचनेचा विनाश झालेला पाहू शकत नाही, मग हे तर बेहदचे वडील आहेत, दयेचे महासागर आहेत, मग ते विनाश कसा काय होऊ देतील बरं?आज सर्वत्र विनाशाच्या लहरी पसरताना आपण पाहतो आहोत, पुर्वी याच लहरींच्या फलस्वरूप दूसरे विश्वयुध्दाची ठिणगी पडली होती आणि आता तिसऱ्या विश्वयुध्दाच्या उंबरठ्यावर आपण येऊन ठेपलो आहोत.

विनाशाच्या संकल्पांनी पूर्ण दुनियेचं वायुमंडळ निगेटिव्ह झालेलं आहे. वायुमंडळ एवढं निगेटीव्ह झालेलं आहे की परिवर्तनाचे संकल्प करणं सुध्दा असंभव आहे. मग या पतित दुनियेचं परिवर्तन संभव आहे का?बापूजींनी आम्हाला आपल्या त्याग-तपस्येच्याद्वारे बेहद विश्वाच्या परिवर्तनाचे अनमोल ज्ञान दिले की अखेर ही दुनिया कशाप्रकारे बदलेल, आणि हे ज्ञान आजपर्यंत कुणीच दिले नव्हते. उत्तर जाणून घेण्यासाठी आधी प्रश्न समजून घ्यायला हवा. म्हणजे ही दुनिया कशी बदलता येईल हे शोधून काढण्यासाठी आधी ही दुनिया पतित कशी झाली हे समजून घेणे गरजेचे आहे. बापूजींनी आपल्याला सांगितले आहे की ही दुनिया पतित होण्याचे कारण आहे आत्म्याची शक्ती संपुष्टात येणे.आत्म्यांनी सततचा नकारात्मक विचार केल्याने वायुमंडळ पण नकारात्मक झाले आहे. जर आपण वायुमंडळात बदल घडवू इच्छित असू तर मग आत्म्यांच्या नकारात्मक विचारसरणीला पूर्णविराम द्यावा लागेल, म्हणूनच बापूजी म्हणतात की स्वपरिवर्तनातूनच विश्व परिवर्तन घडेल.

आता तर महापरिवर्तनाची वेळ आहे. युगपरिवर्तन व्हायच्या ऐवजी परम तत्वं आणि परम प्रकाशाची नवीन दुनिया उदयाला येणार आहे. बापूजी बेहदचे नवीन अमरलोक स्थापन करण्यात पूर्ण वेळ आपल्या पूर्ण शक्तीनिशी काम करत आहेत. बेहदचे जे अमर्याद बच्चे आहेत त्यांच्या साठी बेहदचा समय चालू झाला आहे. बेहदचे विश्व परिवर्तन खास करून बेहदच्या मुलांसाठी आहे जे बेहदच्या बापूजींना ओळखतात. त्या बेहद आत्म्यांना अमर्याद खुशी, परमानंद, आणि परम सुखाचा अनुभव होईल. परिवर्तनाचे वेळी बेहदच्या आत्म्यांकडे दिव्य द्रुष्टी आणि दिव्य शक्ती येईल. जसजसे ९ लाख आत्मे निःसंकल्प होतील तसतसे बेहदचे विश्व परिवर्तन व्हायला सुरुवात होईल आणि हळूहळू ही परिवर्तनाची प्रक्रिया जलदगतीने वाढत जाईल. असे करता करता ३३करोड देवी देवता पण व्यक्त

अवस्थेतून अव्यक्त स्थितीचा अनुभव करतील.भारत देशात परम प्रकाश उतरेल. भारत खरोखरीच सोन्याची चिमणी होईल. तत्व परिवर्तन होईल. जसजसा परम प्रकाश धरतीवर येईल तसतसा वायु-परम वायुमध्ये बदलेल, सर्व तत्त्वं परम तत्वांमध्ये परिणत होतील. हळूहळू गैलेक्सी, यूनिवर्स, मल्टीवर्स पर्यंत परम प्रकाश भरेल आणि सर्व परम प्रकाशात बदलून जाईल.

## ९. स्वपरिवर्तनातून विश्व परिवर्तन कशाप्रकारे होईल?

---

एवढ्या अवाढव्य दुनियेचं परिवर्तन करण्याची क्षमता कुणाकडे आहे? ज्याने विश्वाचे सृजन केले तोच त्याचा विनाश किंवा परिवर्तन करू शकतो. उदा एक शिव केवळ आपले स्वतः चे ब्रम्हांड बदलू शकतो, महाशिव आपले महाब्रम्हांडाचे परिवर्तन करू शकतो तसेच परम महाशिव आपल्या परम महाब्रम्हांडाचे परिवर्तन करू शकतो.

जेंव्हा या अनंतानंत विश्वाचे परिवर्तन करायचे असेल तेंव्हा तेही केवळ सर्वोच्च परमात्मा, बेहदचे दादाजीच करू शकतात कारण तेच या अनंतानंत विश्वाचे मालक व रचनाकार आहेत. बेहदच्या बापूजींनी क्रुष्ण अवतारात बेहदच्या आत्म्यांचे सृजन केले व या धरतीवर गुप्त रूपाने परिवर्तनासाठी मनुष्य रूपात पाठवले. आज ते सर्व आत्मे मनुष्य अवतारात धरतीवर अस्तित्वात आहेत. ते सर्व आत्मे अपेक्षित परिवर्तन करू शकले नाहीत. आता हे बेहदचे आत्मे बेहदचे ज्ञान समजून घेऊन बेहदचे विश्व परिवर्तन करायला सहाय्यक होतील. १०८, १००८, १६ हजार आणि ९ लाख बेहदचे आत्मे आहेत. क्रुष्ण अवतारापासून ते आत्मे धरतीवर आहेत. बेहदचे आत्मे परम प्रकाश आणि परम तत्वांपासून बनलेले आहेत, तर हदचे आत्मे आकाश, वायू आणि अग्नि तत्व यापासून बनलेले आहेत. आणि प्रत्येकाच्या आतील प्रकाशानुसार त्यांच्या पाशी वेगवेगळ्या शक्ती आहेत. हदच्या आत्म्यांची मुक्ती आणि बेहदच्या मुलांची जीवन मुक्ती होईल असे ठरलेले आहे. जेंव्हा सर्वोच्य परमात्म्याने या मल्टीवर्सच्या ब्रम्हांडात गडबड किंवा दोष पाहिला तेंव्हा ते स्वतः गुप्त रूपात या ब्रम्हांडात आले. सुरूवातीला सर्व आत्मे परम तत्वांपासून बनलेले होते. नंतर हळूहळू तीन तत्वांची रचना झाली आणि नंतर पाच तत्वांची रचना झाली. स्थूल जगताचे कारण काय आहे? हे समजून घेण्यासाठी सर्वोच्च परमात्मा धरतीवर येतात. परिवर्तनाची प्रक्रिया एक टप्प्या-टप्प्याने पार पडणारी प्रक्रिया आहे. यामध्ये तत्वांचे परम तत्वांमध्ये परिणमन होते. परिवर्तन एक परम शांतीची प्रक्रिया आहे. १०८, १००८, १६ हजार आत्मे जेंव्हा निःसंकल्प अवस्था धारण करतील तेव्हां बेहदचे वडील ९ लाख आत्म्यांच्या समोर प्रत्यक्ष होतील. बेहदचे वडील अव्यक्त स्वरूपात प्रत्यक्ष होतील. अंतसमयी बेहदचे वडील बेहदच्या आत्म्यांना नजरेनेच क्रुतार्थ करतील. सर्व बेहदच्या आत्म्यांवर पाच तत्वांच्या शरीराचे आवरण चढलेले आहे. बेहदचे वडील जेंव्हा बेहदच्या आत्म्यांना परम प्रकाश देतील तेव्हां ते बेहदचे आत्मे आपली शक्ती ओळखतील. एकेका बेहद आत्म्यामध्ये अनेक खरब सूर्याएवढा परम प्रकाश भरलेला आहे, परंतु ते मनुष्य अवतारात आपली शक्ती विसरून गेले आहेत. बेहदच्या जजमेंट डे ला बेहद आत्म्यांना नेण्यासाठी परम प्रकाशाचे विमान येईल आणि बेहद आत्म्यांना साकारी (पाच तत्वातून) तून आकारी (३ परमतत्वे) आणि आकारीतून निराकारी (परम प्रकाश आणि आत्म स्वरूप (soul conscious) आत्मे बनवण्यात येईल. परिवर्तनाच्या वेळेस हद आणि बेहदच्या आत्म्यांच्या वेळा (समय) वेगवेगळ्या होतील.

उंचच उंच परमधामामध्ये बेहदचे आत्मे जातील. धरती पण परम तत्वांची होईल. जेंव्हा मनुष्य प्राणी श्वास घेईल तेंव्हा परम वायुतत्व आत प्रवेश करेल. मनुष्याची विचारसरणी बदलून जाईल. जेंव्हा सूक्ष्म शरीरातील वायुतत्व

बदलेल तेंव्हा स्थूल शरीरातील वायुतत्व पण बदलून जाईल. नंतर मग मनातील विचार पण बदलून जातील.सत्युग किंवा स्वर्ण युगात आत्म्यांची सत्वगुणप्रधान अवस्था असते. त्याहीपेक्षा श्रेष्ठ असे बेहद आत्म्यांची हीरेतुल्य परम प्रकाशाची अवस्था होईल. हा मृत्युलोक अमरलोक बनून जाईल. ही सृष्टि जन्म मरण विरहित होऊन जाईल. पूर्ण दुनिया परम तत्वांची आणि परम प्रकाशाची होईल. अविनाशी अमरलोक येईल. सत्युग, त्रेता, द्वापार आणि कलियुगाची श्रृंखला मोडून जाईल, कारण त्या सर्व या स्थूल धरतीवरच्या घटना होत्या. आता अनंतानंत ब्रम्हांडांमध्ये कुठेही स्थूल तत्वे आणि जन्म मरण शिल्लक राहणार नाही. सर्वकाही परम तत्वांचे होऊन जाईल. विनाश होणार नाही. बेहदचे वडील या धरती आणि अनंतानंत महाब्रम्हांडांचे परिवर्तन करण्यासाठी आले आहेत त्यामुळे आता मुक्ती जीवन मुक्तीचे कार्य पण जोरात सुरू होईल.

स्वपरिवर्तनातूनच विश्व परिवर्तन होऊ शकते.म्हणून आपण आधी स्वपरिवर्तन समजून घेऊ. व्यक्त स्वरूपातून अव्यक्त स्वरूप धारण करणे म्हणजे स्वपरिवर्तन होय.जेंव्हा आत्मा स्वयं परिवर्तन करतो तेव्हा त्याच्या शरीराचे पण परिवर्तन होऊन जाते. मग व्यक्त आणि अव्यक्त म्हणजे नेमके काय?व्यक्त म्हणजे पाच तत्वं आणि अव्यक्त म्हणजे परम प्रकाश. जेंव्हा आत्मा परम प्रकाशात राहून स्वपरिवर्तन करतो तेव्हा तो आत्मा अंतःवाहक शरीर धारण करतो. एकेक बेहदच्या आत्म्यामध्ये अनेक खरब सूर्यप्रकाशाची शक्ती असते. जेंव्हा बेहदचे आत्मे स्वपरिवर्तन करतील तेंव्हा वायुमंडळात परम प्रकाश पसरेल. जेंव्हा १०८, १००८, १६ हजार आणि ९ लाख बेहदचे आत्मे स्व परिवर्तन करतील तेव्हां तर पूर्ण ब्रम्हांडामध्ये परम प्रकाश पसरेल. याप्रमाणे बेहदचे विश्व परिवर्तन सुरु होईल.नंतर एक धरती बदलेल, मग एक सोलर सिस्टीम बदलेल, एक गैलेक्सी बदलेल, नंतर युनिवर्स बदलेल आणि असे करता करता आपले १०० कला म्हणजे गुणांचे ब्रम्हांडाचे म्हणजे पूर्णच्या पूर्ण मल्टीवर्सेस चे परिवर्तन होत जाईल. आणि अशाप्रकारे मृत्युलोकाचे अमरलोकात रूपांतर होईल. इथे आता पुन्हा कधीही ५ तत्वांची दुनिया असणार नाही. बेहदचे विश्व परिवर्तन होणार आहे.

केवळ या धरतीचेच नाही तर संपूर्ण विश्वाचे, मल्टीवर्स चे परिवर्तन होणार आहे. हा मृत्युलोक अमरलोक होणार आहे. तत्वांपासून परम तत्वांची दुनिया तयार होणार आहे. हदच्या आत्म्यांना मुक्ती आणि बेहदच्या आत्म्यांना जीवन मुक्ती मिळणार आहे.

आताचा बहुमूल्य वेळ आहे तोपर्यंत सर्वांनी बेहदच्या वडिलांना आठवत म्हणजे योगाद्वारे आठवत राहिले पाहिजे. आत्म्यामध्ये शक्ती आली की विकर्म विनाश होतील. जेंव्हा परिवर्तनाची वेळ सुरु होईल तेंव्हा ३३ कोटी देवी देवता तर आपापल्या मूळ ब्रम्हांडामध्ये निघून जातील. बेहदचे आत्मे पण बेहदच्या परमधामामध्ये निघून जातील. मल्टीवर्सेस चिरंतन काळासाठी अमरलोक बनून जाईल.

## १०. बेहदचे सहयोगी कसे व्हावे

-----------------------------------------------------

आपण बेहदची परम परम परम महाशक्ती आहोत. जर आपण हा मंत्र लक्षात ठेवला तर आपण unstoppable होऊन जाऊ आणि आपल्याला कुणीही रोखू शकणार नाही. आपल्याला आपले दिवसाचे ६० हजार सेकंद हाच संकल्प आणि विचार करण्यात घालवायचे आहेत की आपण सर्व आत्मे, परम तत्वं, परम ज्योती सूर्याच्या प्रमाणे प्रकाशित झाले आहेत. जेंव्हा १०८, १००८, १६ हजार आणि ९लाख आत्मे सूर्याच्या प्रमाणे परम प्रकाशमान होतील आणि पूर्ण वायुमंडळ बदलून जाईल.जेंव्हा आपण परम तत्वाच्या सागरासमान होऊ तेंव्हा वायुमंडळात असे काही परिवर्तन येईल की सामान्य माणूस कुठल्याही प्रकारच्या विषय विकाराचे चिंतन करू शकणार नाही, कारण आत्ताचे वायुमंडळ आपल्या आतमध्ये कुठल्याही प्रकारच्या निगेटीव्ह लहरींना येऊच देणार नाही.

गीतेमध्ये श्रीकृष्णांनी सांगितले आहे की "ज्ञानासमान पवित्र बनवणारी कुठलीही वस्तू किंवा तत्व नाही आहे. ज्ञानामध्ये असीम आनंद आहे व ज्ञानाने परमसुखप्राप्त होते. जेंव्हा आपल्या आत्म्याच्या चेतनेचा स्तर वाढतो तेंव्हा आत्म्यामध्ये बल, आणि शक्ती येते." आपल्याला आपली बुद्धी अमर्याद परमात्म्याशी एकरूप करायची आहे. आपल्याला परम सुखाचा अनुभव कधी होईल? जेंव्हा आपल्यामध्ये परम प्रकाश येईल व त्याने तुम्ही भरून जाल, तेंव्हा जी तुमची रचना तुमच्या १०० trillion cells मधून निघाली आहे, मग ती साकार असो, सूक्ष्म जगतात असो, किंवा पारलौकिक जगतात असो त्यांना ते सुखशांतीचा अनुभव करतील. तुमच्या रचनेला जे काही पाहिजे असेल ते प्राप्त होईल-मुक्ती हवी असेल तर मुक्ती आणि ज्ञान हवे असल्यास ज्ञान मिळेल. जर तुम्ही अमर्याद असाल तर तुमच्या रचनेला पण अमर्याद आनंद देऊ शकाल. तुम्ही आपल्या रचनेला जीवन मुक्ती मिळण्यासाठी निमित्त होऊन जीवन मुक्ती दाता बनाल. आपल्याला फक्त बेहदच्या वडिलांवर निश्चय आणि विश्वास ठेवायचा आहे आणि कर्मयोग करायचा आहे, बाकी सगळे बेहदचे वडील करून घेतील.

वायुमंडळाला जर बदलायचे असेल तर बापूजींचे ज्ञान ऐका, तर तुमची अवस्था चढती कला होईल आणि तुमचे विचार बेहद मध्ये जातील आणि पवित्र होईल. आपला ओरा म्हणजे वलय पवित्र, आणि पांढऱ्या शुभ्र प्रकाशाचे होईल.नेहमी हाच संकल्प करत रहा की आपल्या प्रत्येक श्वासातून परम तत्व आपल्या आतमध्ये भरत आहेत आणि बाहेर वायुमंडळात पण पसरत आहेत. आपल्या चहुबाजूंनी शुद्ध आणि पांढऱ्या शुभ्र प्रकाशाचे कवच बनले आहे. आपल्या ह्रदयात मेंदू पेक्षा ५००० पट जास्त शक्ति असते (हे विज्ञानाने सिध्द केले आहे). जर आपण बेहदच्या वडिलांना मनापासून आठवण करीत असलो तर आणि बापूजींशी लवलीन अवस्थेत एकरूप होऊन रहात असाल तर आपल्या आतमध्ये अनंतानंत ब्रम्हांडाच्या शक्ती येतात. ज्ञानाशिवाय दुसरा काही विचारच करायचा नाही आहे. जसजशी आपल्या आत्म्याच्या शक्ती वाढतील, तसतसे बेहदचे ज्ञान समजायला लागेल.

बेहदच्या मुलांना सततचा संकल्प करायचा आहे की मी एक बेहदच्या बेहदची परम परम परम महान आत्मा आहे. याच्यातून बेहदच्या लहरी तयार होतील. सतत हाच विचार करायचा आहे की “मी बेहदच्या बेहदची परम परम परम महान आत्मा आहे. मी भ्रुमध्याच्या ठिकाणी राहतो. माझे रचनाकार बेहदचे दादाजी आहेत आणि मला बेहदच्या स्वपरिवर्तनासाठी बेहदच्या दादाजींच्याकडून परम प्रकाशाची शक्ती घ्यायची आहे.” आकारी स्वरूपात सुध्दा निराकारी रूपाच्या सर्वोच्च परमात्म्याकडून पावर घेताना आपल्याला संकल्प करायचा आहे की बेहदच्या बेहदची परम परम परम महाशांती होत आहे. ह्याने तुमचा ओरा पण चांगला होईल. जेंव्हा आत्मा आत्मस्वरूपाची अनुभूती करतो तेव्हा त्यांच्या बुद्धी मध्ये बेहदचे वैराग्य येईल. मर्यादित वस्तूंबद्दल वैराग्य येईल. आत्म्यामध्ये शक्ती येईल. आत्मा प्रकाशाच्या स्वरूपाचा अनुभव करेल. जेंव्हा आत्मा आत्मस्वरूपाची अनुभूती करेल तेंव्हा त्यांच्या कारण आणि सूक्ष्म शरीरात परम तत्व येतील. तुम्ही परम सुखाचा अनुभव कराल. तुमचा ओरा पण परम तत्वांचा होईल. बुद्धी नेहमी बेहदच्या ज्ञानात राहतील. स्व परिवर्तनातूनच विश्वपरिवर्तन होईल.

【ज्ञान सार- ८ तास बेहदच्या ज्ञानासाठी अभ्यास करावा, आत्मस्वरूपाचा अनुभव करा. ओरा क्लीन करा, ओरा परम लाइटने भरलेला राहील, त्याच्यासाठी योग करा, वायुमंडळाचे परिवर्तन करा, परम तत्व, परम लाईट परमात्म्याकडून घ्या. आपण आतमध्ये हाच पुरूषार्थ करा की मी बेहदची परम परम परम चांगला/चांगली आहे. आपल्याला बुद्धी द्वारे बेहदच्या कलेच्याही पार जायचे आहे आणि बेहदच्या शक्तींना आठवा आणि बेहदच्या वडिलांकडून शक्ति घ्यायची आहे असा संकल्प करा.】

## ११. आत्मस्वरूपात परम लाईटची प्राप्ती

------------------------------------------------------

आज सर्वजण जाणतात की हे शरीर आत्मा चालवतो. आणि आत्म्याच्या अस्तित्वाला सर्व धर्म मानतात. कुणी त्याला आत्मा म्हणतात, कुणी रूह म्हणतो, तर कुणी "soul" असे म्हणतात. आत्मा आपल्या मेंदूच्या मध्यावर राहतो. अजून आधुनिक विज्ञान पूर्णपणे आत्म्याचे अस्तित्व मान्य करत नाही. पण त्यांच्या मते आत्मा एक "कॉन्शियस एनर्जी" आहे जी जागृत आहे. आत्मा भ्रुमध्याच्या ठिकाणी राहतो. आपल्या शास्त्रानुसार आत्म्याला ब्रम्हस्वरूप पण म्हटले जाते. ब्रम्ह म्हणजे प्रकाश. शिवाच्या निराकारी रूपाला ब्रम्ह म्हणतात. आत्मस्वरूपाची अनुभूती करण्यासाठी आधी हा संकल्प वारंवार करत रहा की मी आत्मा आहे. चालता-फिरता,काम करताना सतत हाच पुरूषार्थ करा की मी आत्मा आहे. यामुळे प्रत्येकाला आपल्या अशरीरीपणाचा अनुभव होईल. आत्मा एक ज्योती स्वरूप आहे. आज या तमोप्रधान वायुमंडळात मनुष्याला आत्मस्वरूपाचा अनुभव करणे खूप कठीण आहे. आत्मस्वरूपाची अनुभूती आत्म्याला परमात्म्याशी जोडले गेल्यानंतर होऊ शकते. गीते मध्ये पण लिहिले आहे की "तू देह आणि देहाचे सर्व संबंधितांना विसरून, आत्मस्वरूप हो आणि मला म्हणजे परमात्म्याला आठवत रहा, म्हणजे ध्यानात रहा तर मी तुझी सर्व पापे नष्ट करून टाकीन." आत्मा जेंव्हा निराकारी शिव परमात्म्याशी जोडला जातो तेंव्हा त्याच्यात शक्ती येते, आणि कारण शरीरात पण शक्ती येते. थोडे विकर्म विनाश पण होतात पण त्या शक्तीचा चुकीचा उपयोग जसे अतिविचाराने आणि संकल्प प्रयोग केल्याने ती शक्ती वाया जाते.

आत्मस्वरूप होऊन आपण जेंव्हा परमात्म्याला आठवतो तेंव्हा आत्म्यात शक्ती येते. साधु, संत, गुरु यांना भजल्याने काही शक्ती मिळत नाही. गीतेत पण सांगितले आहे की ज्याचे तुम्ही ध्यान कराल त्यालाच प्राप्त व्हाल. म्हणून योग नेहमी सर्वोच्च परमात्म्याशीच लावावा. नेहमी थेट बेहदच्या पावर हाऊसशीच योग लावावा. आत्मस्वरूपाची अनुभूती कशी होईल? ती अनुभूती करण्यासाठी आत्म्यामध्ये शक्ती पाहिजे. फक्त "मी आत्मा आहे" असे म्हटल्याने आत्मस्वरूपाची अनुभूती होत नाही. हा एक लांबलचक पुरूषार्थ आणि अभ्यास आहे.

अंतिम पुरूषार्थ मनाचे मौन हे आहे.अंतर्मुखी सदा सुखी. दिव्य स्वरूप धारण करणे हे आहे. बेहदच्या वडिलांचे रूप धारण केल्याने विकर्म विनाश होतात. आत्मा हलका होतो. अतिंद्रियाँना सुखाचा अनुभव होईल.धरतीवर राहून पाच तत्वांमध्ये परम तत्वांच्या स्वरूपाचा अनुभव होईल. व्यक्त स्वरूपातून अव्यक्त स्वरूप धारण करण्याचा अनुभव होईल. बेहदचे विश्व परिवर्तन निश्चितच होईल.

## १२. **YOUTUBE CHANNEL** ची महत्वपूर्ण माहिती

---------------------------------------------------------

बापूजींच्या बेहद ज्ञान सागरात सर्व बेहदच्या आत्म्यांचे स्वागत आहे. इथे खाली दिलेली माहिती लक्षपूर्वक वाचा. बापूजींच्या चॅनलमध्ये ५०० पेक्षा जास्त मुलाखतीचे व्हीडिओ आहेत. काही विशेष व्हिडिओंची माहिती खाली दिलेली आहे :-

1. Life

१. लाईफ आफ्टर डेथ - मृत्यु के बाद का जीवन- १, २
२. क्या पति पत्नी का पिछले जन्मो का रिश्ता होता है?
३. आत्मा के १० अद्भूत रहस्य
४. भविष्य की दुनिया पार्ट १ & २
५. मृतक आत्मा को क्यों याद न करें? उनकी फोटो क्यों न लगायें? उनके कल्याण के उपाय
६. सदी का श्रेष्ठ वीडियो....कैसे जन्मी थी "मौत"?
७. मोस्ट पावरफुल वाइब्रेशन जो यूनिवर्स को बदल सकते हैं
८. कल्कि अवतार
९. बेहद की परम महाशांती मंत्र का अर्थ
१०. मृत्यु और पुनर्जन्म के बीच का समय
११. वर्ल्ड ड्रामा(समय चक्र)
१२. जजमेंट डे
१३. आत्म स्वरूप में परम लाईट की प्राप्ती
१४. सीक्रेट ऑफ योगा, योग कैसे करें?
१५. ब्रम्हांड के सर्जन का रहस्य
१६. आध्यात्मिक ज्ञान का महत्त्व
१७. दुनिया परिवर्तन की भविष्यवाणी
१८. कारण शरीर की वासना से मुक्ती
१९. श्रीमत् भगवत्गीता सार
२०. मोक्ष और जीवन मुक्ती का रहस्य
२१. अतिगुप्त कर्मों का फल जिसका साक्षी खुद और खुदा हो
२२. काला जादू और अध्यात्म
२३. सूक्ष्म शरीर ,कारण शरीर, महाकारण शरीर के रहस्य

२४. तीसरे नेत्र की विस्तृत जानकारी

२५. परम महाशिवयोग

२६. आत्मबल को कैसे बढायें?

२७. बेहद के अविनाशी परमधाम का वर्णन

२८. समय यात्रा

२९. मंगल ग्रह पर जीवन

३०. शक्तिपात का अनजाना सच

३१. बापूजी के जीवन का परिचय

३२. 36 यक्ष के प्रश्न, युधिष्ठिर का जवाब

३३. 60 सुपर इंटेलिजेंट रैपिड फायर प्रश्नोत्तर

लोकांच्या सोयीसाठी बापूजींच्या चेनलवर प्लेलिस्ट तयार आहे जी नावे खालीलप्रमाणे आहेत ः

"अनस्पोकन ट्रुथ"

"इंटरव्ह्यु विथ बापूजी"

यामध्ये असे काही प्रश्न आहेत जे आपले अस्तित्व जाणून घ्यायला मदत करतील. अध्यात्माच्या मार्गाने चालताना स्वतः आणि त्या परमात्म्याशी निगडित अनेक अकल्पित रहस्य जाणून घेण्यासाठी वरील विडीओची मदत होईल. म्हणून ते अवश्य पहायला हवेत. यामुळे आपले जीवन पूर्णपणे बदलून जाईल.

आजच बापूजींचे यूट्यूब चॅनल सर्च करताना लिहा "बापूजी दशरथ भाई पटेल" किंवा सर्च कराः www.youtube.com/anant98251 यावर क्लिक करा आणि चैनलला सबस्क्राईब करा. जेणेकरुन आमचे नवीन येणारे सर्व व्हीडीओ आपण सहजपणे पाहू शकाल. व्हीडीओ पाहून झाल्यावर लाईक आणि सुंदर कमेंट्स करायला विसरू नका, तुमच्या कमेंट्स वाचून इतरांना पण बेहद ज्ञानात येण्याची स्फूर्ती मिळत राहील.

यासोबतच "माँ का दिव्य संदेश" या चँनलवर आपले काही व्हिडीओ मराठी भाषिकांच्या सोयीसाठी उपलब्ध आहेत. त्यांची यादी खालील प्रमाणे ः

१. मृत्यु पश्चात जीवन भाग१,२

२. खरी शुध्दता मन,बुद्धी संस्कारांची पवित्रता

३. महाभारत भाग १,२

४. मेलेल्या आत्म्याची आठवण का करू नये

५. मी कोण आहे, शरीर की आत्मा

६. आत्मस्वरूपात परमप्रकाशाची प्राप्ती १,२

७. परमेश्वर खरंच अस्तित्वात आहे का?

८. आत्मस्वरूपाची प्राप्ती १,२

९. सुखाची परिभाषा काय आहे?

१०. नकारार्थी लोकांबरोबर कसे वागावे आणि परमशांतीच्या लहरी कशा पसरवाव्या?

११. शिव मनुष्यात प्रवेश करतात का?

१२. मनुष्याची निर्मिती कशी झाली?

१३. मृत्यु कसा जन्मला?

१४. मानव, देवदूत, आत्मा विद्युत चुम्बकीय क्षेत्र

१५. कलियुगात दु:खाचा कहर झालाय तरीही देव डोळे मिटून बसलाय की काय?

१६. आत्मस्वरूपाची अनुभूती

१७. कारण शरीर व महाकारण शरीर

१८. सुप्रीम कल्कि अवतार भाग १,२,३,४

१९. आत्म्याचे १० आश्चर्य कारक रहस्य

२०. जुळी, तिळी किंवा अनेक गर्भ प्रसूती मागचे रहस्य

२१. पति पत्नीचे मागच्या जन्माचे नाते असते काय?

२२. प्राणशक्ती, प्राणऊर्जा या विषयीचे पूर्ण सत्य

२३. समांतर युनिवर्स अस्तित्वात आहेत का?

२४. प्रतिभा जन्मजात असते की प्राप्त केली जाऊ शकते?

२५. अनेक धर्म पृथ्वीवर कसे आले?

२६. 60 अध्यात्मिक सुपर फास्ट प्रश्नोत्तरे

२७. 36 अध्यात्मिक सुपर फास्ट प्रश्नोत्तरे

२८. न कळत झालेल्या पापाचे प्रायश्चित्त कसे करायचे?

२१. आत्मा milky way galaxy पार करू शकतो का?

सर्वांना विनंती आहे की वरील सर्व व्हिडिओ च्या लिंक आपल्या जवळच्या नातेवाईक व मित्रांसोबत व्हाट्सएपच्या द्वारे शेयर करा जेणेकरुन पूर्ण दुनियेत हे परमज्ञान पोहोचू शकेल. तुमचा एक छोटासा प्रयत्न समस्त दुनियेला बदलून टाकेल. कुठलेही कर्म कधी वाया जात नाही. सर्वांचे कल्याण होवो हीच सदिच्छा. **परम शांती.**

- अनंत पटेल

---

आमच्याशी संपर्क साधण्यासाठी

Email id:
anant@paramshanti.org
ankur@paramshanti.org

तुम्ही आमच्याशी बापूजींच्या ऑफिशियल यूट्यूब चॅनलवर पण संपर्क साधू शकता

YouTube Channel: www.youtube.com/anant98251
Website: www.paramshanti.org
FaceBook:https://www.facebook.com/discoveryofnewworldcom/
Instagram: http://instagram.com/bapujidashrathbhaipatel

आमचा पत्ता ः

विश्व परिवर्तक ईश्वरीय विद्यालय,

% राधे कम्युनिटी हॉल, चैनपुर बसस्टँड जवळ,

न्यू रानीप मार्ग, चैनपुर,

अहमदाबाद-382470

गुजरात (भारत)

## १३. माँजींचे दिव्य सन्देश

-----------------------------------------------------------

मी सर्व भाऊ बहिर्णींना इथे बेहदच्या बाबांचा एक सन्देश देऊ इच्छित आहे. बेहदचा अंतिम समय सुरु झाला आहे.आता अंतिम पुरूषार्थ करण्याची नितांत गरज आहे. बेहदच्या परमात्म्याचा परिचय करून देण्याची वेळ आता जवळ येऊन ठेपली आहे. तसेच सर्वांना हा पण संदेश द्यायला हवा की सर्वोच्च परमात्मा (बेहदचे बाबा) धरतीवर आले आहेत आणि बेहदचे कार्य चालू झाले आहे.ते अविनाशी दुनिया आणि नवीन दुनियेच्या निर्मितीचे ज्ञान देत आहेत. साकार रूपामध्ये बेहदचे सर्वोच्च परमात्मा धरतीवर कार्य करत आहेत. आता अशी वेळ आली आहे जेंव्हा पूर्ण विश्वामध्ये बेहदच्या बाबांचा साक्षात्कार होईल, पूर्ण अमर्याद आणि मर्यादित दुनियेत बेहदचे बाबा प्रत्यक्ष होतील. मी हा संदेश यासाठी पण सर्वांपर्यंत पोचवू इच्छित आहे जेणेकरून अंतसमयी कुणी दोषारोपण करू नये की बेहदचे बाबा धरतीवर अवतरले आणि आम्हाला कुणी कळवलेच नाही. कारण व्यक्त समय आता संपत आला आहे आणि अव्यक्त समय आणि दुनिया सुरु होणारच आहे. अचानक सर्व काही घडणार आहे. बेहदचे बाबा बेहदच्या लेकरांना दिव्य अलौकिक विमानाने परम प्रकाश आणि परम तत्वांच्या दुनियेत घेऊन जाणार आहेत. या स्थूल दुनियेचं परिवर्तन परम तत्वांमध्ये होऊन जाईल. मुक्ती व जीवन मुक्तीची प्रक्रिया पण सुरु होईल. जेंव्हा परम तत्वं आणि परम प्रकाश धरतीवर येतील तेंव्हा कमकुवत आत्मे त्या शक्तीला सहन देखील करू शकणार नाहीत म्हणून आतापासूनच आपल्याला तीव्र पुरूषार्थ करायचा आहे आणि आपले संकल्प विश्व परिवर्तन करण्यासाठी खर्च करायचे आहेत. आता अंतिम उत्थान(उडान) करण्याची वेळ अगदी जवळ आली आहे.

**"सर्वोच्च परमात्मा आपल्याला बेहदच्या दुनियेत घेऊन जाण्यासाठी आले आहेत जिथे सर्वत्र परम तत्वं आणि परम प्रकाश आहे. भविष्यात येणारं युग हे अविनाशी युग-अमरलोक होईल आणि बेहदचे परिवर्तन होऊन जाईल. Silence- म्हणजे योगाच्या शक्तीने नवीनतेची लाट येईल."**

**-----------------------------------------------------------**

**परम महासंकल्प**
**(AFFIRMATIONS)**

मी एक बेहदची परम परम परम महान आत्मा आहे.मी परमात्म्याच्या समान ब्रम्ह स्वरूप आत्मा आहे. मी बेहदची विश्व कल्याणकारी आत्मा आहे. मी बेहदचे विश्व बदलण्यासाठीचा एक निमित्तमात्र आत्मा आहे.

मी बेहदची परम शांतस्वरूप आत्मा आहे. मी बेहद परमानंद स्वरूप आत्मा आहे. मी कर्मयोगी आणि तपस्वी रूप आत्मा आहे. मी आत्मा परम प्रकाशापासून बनलेलो आहे. मी परम दिव्य लाइट स्वरूप आत्मा आहे.

मी प्रकाशासमान परम प्रकाशस्वरूप आहे. मी परम सुखी आत्मा आहे, माझे स्वरूप दिव्य लाईट आणि परम शक्तींनी भरपूर आहे. माझा आत्मा आणि शरीर परम लाईट आणि परम तत्वांनी भरलेले आहे. मी बेहदची परम परम परम महान आत्मा आहे. माझे स्थूल, सूक्ष्म आणि कारण शरीर परम लाईट द्वारे चार्ज झालेले आहे. माझ्या चहूबाजूंनी "बेहदच्या परम परम परम महाशांतीच्या" लहरी आहेत. माझ्या वलयाद्वारे परम शांतीच्या लहरी चहूबाजूंनी पसरत आहेत. समस्त जगतात परम शांती पसरत आहे. समस्त ब्रम्हांडात परम परम परम महाशांती होत आहे. संपूर्ण ब्रम्हांडात, गैलेक्सीत, आणि यूनिवर्स मध्ये परम शांती होत आहे. स्थूल जगत, कारण आणि महाकारण जगतात परम शांती आणि परम सुख होत आहे.

मी देवदूत आहे. माझे शरीर निरोगी आणि चांगले आहे. बेहदचे परम परम परम चांगले होते आहे. मी बेहदच्या परमधामामध्ये स्थित असून परम आनंदात आहे. माझ्या चहूबाजूंनी परम प्रकाश आहे. माझे आभावलय परम प्रकाश आणि दिव्य लाईट ने भरलेले आहे.

मी बेहद खुश आणि सुखी आत्मा आहे. मी संपन्न, संपूर्ण आणि पवित्र बेहदची आत्मा आहे. मी बेहदच्या परमपिता परमात्म्याचा अंश आहे आणि बेहदचा महान आत्मा आहे. मी बेहदचा परम परम परम महान आत्मा आहे. संपूर्ण विश्वात बेहदची परम परम परम महाशांती होत आहे.

याच द्रुढ संकल्पामुळे वायुमंडळात परम शांती मंत्रांच्या लहरींद्वारे बदल होईल आणि समस्त ब्रम्हांड आणि लोकांमध्ये परम शांती होईल. प्रबळ अशा संकल्प शक्तीने निश्चित पणे विश्व परिवर्तन होईलच.

**परम शांती**

---------------------------------------------------------